

**परिसंवाद :**

**सत्ताबदलानंतर मुस्लीम समाजातील वाढती अस्थिरता**

# मुस्लिमांच्या स्वतंत्र वस्त्या

शाहरुख खतीब

मे महिन्यात एका बॉलीवूड कलाकाराला मुंबईत हौसिंग सोसायटीने घर नाकारले. 'मुस्लीम असल्याने मला घर नाकारण्यात आले' अशी तक्रार या कलाकाराने वर्सोवा पोलीस स्टेशनमध्ये केली. तक्रारीत तो म्हणतोय की, फ्लॅट मालकाने विविध कारणासांठी महिनाभर मला प्रतीक्षा करायला लावली. एका महिन्यानंतर त्याने स्पष्ट सांगितलं की, 'मी घर देऊ शकत नाही.' असं कलाकाराने आपल्या तक्रारीत म्हटलंय. दुसरं उदाहरण वसई शहरातले. सप्टेंबर २०१६ला मुस्लीम कुटुंबाला घर नाकारणाऱ्या सोसायटीच्या ९ सदस्यांना अटक करण्यात आली. मुस्लीम कुटुंबाला घर विकायचे नाही असा ठराव सोसायटीने मांडला होता. ठराव मांडणाऱ्या एकूण ११ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. धर्माने मुस्लीम आहे म्हणून घरे नाकारण्याची प्रथा सर्रास पाहायला मिळते. हिंदूबहुल भागात घरे नाकारल्याने मुस्लिमांना नाईलाजाने मुसलमान मोहल्ल्यात घरासाठी जावं लागतं. तर काही वेळी गरज म्हणून ही कुटुंबे एकत्र राहतात. सदर लेखात मुस्लिमांच्या Ghettoisation अर्थात घेट्टो किंवा कंपू तयार होण्याच्या प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला आहे. लेखाचे दोन भागात विभाजन करण्यात आले आहे. पहिल्या भागात कंपूचा अर्थ आणि भारतातील विविध शहरांमधील कंपू तयार होण्याच्या कारणांचा अभ्यास मांडला आहे. दुसऱ्या महत्त्वाच्या भागात पुणे शहरातील मुस्लिमांच्या Ghettoisation अर्थात कंपू तयार होण्याच्या प्रक्रियेची मांडणी करण्यात आली आहे. पुण्यातील मुस्लिमांना घरे किंवा प्रॉपर्टी खरेदी करताना सोसायटी आणि बिल्डरकडून होणारा भेदभाव मुस्लिमांच्या घेट्टो निर्मितीमागील मुख्य कारण असल्याचे निरीक्षण मांडण्यात आले आहे.

> “ *भारताला सांप्रदायिक दंगलीचा मोठा इतिहास आहे. प्रत्येक वेळी अशा दंगलीत मुस्लीम समुदायाची मोठी वित्त व जीवितहानी झाली आहे. यातून सावरण्यासाठी बराच मोठा काळ जावा लागला आहे. अशा परिस्थितीत मुस्लिमांनी प्राचीन काळात असलेल्या टोळ्यांच्या वस्त्यात जगणे पसंत केले. विशेष धर्मसमुहात राहिल्याने हल्ले टाळता येऊ शकतात, अशा भ्रमातून मुस्लिमांचे टोळी समूह वाढले आहेत. अल्पसंख्यांक असलेल्या मुस्लीम समाजात दंगलीच्या असुरक्षिततेतून भयाचे वातावरण निर्माण होणे साहजिक आहे. अशा परस्थितीत जर समाज एकत्र रहात असेल तर हल्ले होणार नाहीत, यातून सततची होणारी हानी टाळता येईल; या भावनेने मुस्लीम समाज स्वतंत्र अशा 'घेट्टो'मध्ये एकवटला गेल्याचे निरिक्षणाअंती दिसून येते.*

### कंपू म्हणजे काय ?

लंडन शहरातील आफ्रिकन वंशीय लोकांच्या वसाहतीचा अभ्यास करताना कैरी पीच नमूद करतो की 'मानवी भूगोलाच्या व्याख्येनुसार घेट्टो म्हणजे असे भौगोलिक क्षेत्र की विशेषत: एका वंशाच्या अथवा सांकृतिक साम्य असणाऱ्या लोकांचा भूभाग.' या व्याख्येनुसार भारतातील विविध शहरांतील मुस्लीम समाजाच्या वेगळ्या वस्त्यांना घेट्टो म्हणून बघितले जाऊ शकते.

दिल्ली, कोलकाता, मुंबई, हैदराबाद, अहमदाबाद, बंगळुरू आणि अन्य शहरांतील मुस्लीम समाज हा अशा घेट्टोमध्ये राहताना आढळतो. या घेट्टोनिर्मितीमागे प्रामुख्याने असुरक्षिततेची भावना असते. भारतात मुस्लीम समाजाबाबत असलेली टोकाची द्वेषभावना हेदेखील या घेट्टोमागे महत्त्वाचे कारण मानले जाते. राजकीय स्वार्थापोटी पसरवलेली घृणा, तुच्छतावाद, हिणकसपणा इत्यादी बऱ्याच कारणांनी घेट्टो तयार होण्याच्या प्रक्रियेला हातभार मिळालेला दिसून येतो.

'बाहेरचे', 'निराळे', इतर लोकांपासून वेगळे अशा प्रतिकांचा वापर करुन मुस्लिमांच्या कंपू तयार होण्याच्या प्रक्रियेला फ़लस्वरूप देण्यात आले. प्रो. शबान 'भारतीय शहरातील मुस्लिमांचे जीवन' या पुस्तकात म्हणतात, 'मुस्लिमातील दुराव्याची भावना अणि त्यांचे निराळेपण हे मुस्लिमांप्रती वापरल्या जाणाऱ्या अपमानकारक शब्दावलीचे द्योतक आहे' उदाहरणार्थ, मुस्लीम बहुसंख्याच्या वस्तीला 'मिनी पाकिस्तान', 'पाकिस्तान गल्ली' संबोधित करुन मुस्लिमांची हेटाळणी करणे. अहमदाबादमधील जुहापुरा मुस्लीम बहुल भाग असो वा पुण्यातील बहुसंख्य मुस्लिमांची वस्ती असलेला कोंढवा; या मुस्लीम निवासी भागांना तुच्छतादर्शक विशेषण जोडले गेलेले पाहावयास मिळते. अलीकडे मुस्लीम म्हणजे गलिच्छ, आक्रमक, शांतीचे वावडे असणारा समाज अशी परिमाणे जोडून मुस्लिमांची वेगळी प्रतिमा तयार करण्याचा राजकीय प्रयत्न करण्यात येत आहे.

## दंगली आणि असुरक्षितता

भारताला सांप्रदायिक दंगलींचा मोठा इतिहास आहे. प्रत्येक वेळी अशा दंगलीत मुस्लीम समुदायाची मोठी वित्त व जीवितहानी झाली आहे. यातून सावरण्यासाठी बराच मोठा काळ जावा लागला आहे. अशा परिस्थितीत मुस्लिमांनी प्राचीन काळात असलेल्या टोळ्यांच्या वस्त्यात जगणे पसंत केले. विशेष धर्मसमूहात राहिल्याने हल्ले टाळता येऊ शकतात, अशा भ्रमातून मुस्लिमांचे टोळीसमूह वाढले आहेत. अल्पसंख्यांक असलेल्या मुस्लीम समाजात दंगलीच्या असुरक्षिततेतून भयाचे वातावरण निर्माण होणे साहजिक आहे. अशा परिस्थितीत जर समाज एकत्र राहात असेल तर हल्ले होणार नाहीत, यातून सततची होणारी हानी टाळता येईल; या भावनेने समाज स्वतंत्र अशा 'घेट्टो'मध्ये एकवटला गेल्याचे निरीक्षणाअंती दिसून येते.

*मुस्लिमांना घर नाकारणाच्या बऱ्याचशा प्रकरणात मांसाहार सेवनाचं कारण पुढे केल्याचे दिसते. परंतु मुस्लीम रहिवासी नसणाऱ्या बऱ्याच हौसिंग सोसायटीत ज्यांमध्ये बऱ्याचशा को-ऑपरेटिव्ह आहेत, अशा सोसायटीत मांसाहार करणाऱ्या समाजाचे लोक आढळतात, पण ते मुस्लीम नाहीत. हे स्पष्ट आहे की मांसाहार हे मुस्लिमांना घर नाकारण्यासाठी सोयीस्कररीत्या अवलंबलेली शक्कल आहे.*

सुरक्षेला प्राधान्य देणाऱ्या मुस्लीम समाजाचे घेट्टोंमध्ये एकत्रित होणे हे वरचेवर होणाऱ्या हिंदू-मुस्लीम तणावाचे द्योतक आहे, असे म्हणावे लागेल. मुंबई शहरात तयार झालेल्या मुस्लीम समाजाच्या घेट्टोंचा सूक्ष्म अभ्यास प्रो. शबान यांनी केला आहे. घेट्टोमध्ये राहात असणारे मुस्लीम स्वत:ला अधिक सुरक्षित समजतात. दंगलीच्या परिस्थितीत ते आपली सुरक्षा करू शकतात. असा विश्वास या समाजाला वाटतो. जोपर्यंत हा समुदाय स्वतःच्या सुरक्षिततेबद्दल निश्चिंत होणार नाहीत, तोपर्यंत ते या घेट्टोतून बाहेर येणार नाहीत, असे निरीक्षण शबान यांनी मांडले आहे. धार्मिक द्वेष आणि दंगलीतून शोषित समाजाचे धार्मिक ध्रुवीकरण वाढते. हिंदू आणि मुस्लीम समाजातील दरी वाढवून त्याचा बहुसंख्याक (Majoritarian) राजकीय व्यवस्थेने फायदा उठवला. भाजपचा इतिहास भारतीय राजकारणात सतत ध्रुवीकरणाचा राहिला आहे. या राजकारणाचा भाजपला फायदा झाल्याचे अहमदाबाद, गोध्रा, कोक्राझार, मुझफ्फरनगरसारखे बोलकी उदाहरणे नजरेसमोर आहे. कलुषित सामाजिक वातावरणामुळे मुस्लीम समाजात भीतीचे वातावरण तयार झाले आहे. या एकत्रित राहण्याच्या वृत्तीला मिळालेल्या चालनेतून मुस्लीमबहुल कंपूच्या निर्मितीला हातभार लागल्याचे निदर्शनास येते.

सच्चर कमिटीने आपल्या अहवालात मुस्लीम समाजाच्या वाढत्या असुरक्षिततेबद्दल भाष्य करताना म्हटले आहे की, मुस्लीम समाजाच्या असुरक्षिततेचे प्रमाण, त्याचा आवाका आणि तीव्रता राज्यागणिक बदलते. कुठलीही धार्मिक दंगल मग ती छोटी असो वा मोठी असो तिचा मुस्लीम समाजमनावर मोठा परिणाम होतो. हा परिणाम दूरगामी स्वरूपाचा असतो. सरकारचे दुर्लक्ष आणि अशा घटनांकडे राजकीय भांडवल म्हणून बघणाऱ्या बऱ्याच संघटनांमुळे देशातील मुस्लीम मने कलुषित केली आहेत. पोलीस आणि मीडिया अशा घटनांना भडकपणे प्रसिद्धी देतात. अनेक वेळा ते शोषित समाजालाच दोष देत असतात. दंगल करणारे निर्दोष व सोसणारे आरोपी अशी प्रतिमा माध्यमे उभी करतात. दंगलीत बळी पडलेल्या मुस्लिमांना मिळणाऱ्या नुकसानभरपाई वाटपात भेदभाव केला जात असल्याचे दिसते. (पान-११, अहवाल, सच्चर समिती)

१९९२ साली बाबरी मस्जिद पतनानंतर देशभरात दंगली उसळल्या. खरं पाहता याच दंगलीनंतर मुस्लीम समाजात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली. मुंबईत दंगलींमुळे मुस्लीम समुदाय डोंगरी व मुंब्रा अशा दोन ठिकाणी विभागला. १९९३ला अतिशय छोटा असलेला हा भाग आज विस्तीर्ण झाला आहे. मुंबईत रोजगारासाठी येणाऱ्या प्रत्येक मुस्लिमांची राहण्यासाठी पहिली पसंती मुंब्रा, ठाणे, भायखळा आणि डोंगरी अशी असते.

२००१ साली झालेल्या गुजरात दंगलीचा परिणाम असा झाला की, अहमदाबाद शहरात पूर्वी असणाऱ्या संमिश्र वस्त्यांचं रूपांतर परस्पर भिन्न अशा हिंदू अणि मुस्लिम घेट्टोंत झाले. दंगलीच्या परिणामावर भाष्य करणाऱ्या 'गुजरात जिनोसईड'(Gujarat Genocide)या महितीपटात निवासी कंपूचे भयानक चित्र पाहायला मिळतील.

दिल्ली शहरातील मुस्लीमबहुल भागाचा अभ्यास देवकी मेनन



।। श्री जगदंबा प्रसन्न ।।

गोडाधोडाची पंगत, रांगोळ्यांची रंगत ।
दिव्यादिव्यांची संगत, फटाक्यांची गंमतच गंमत ।।

दीपावली हार्दिक शुभेच्छा !







# वासुदेव
## फर्निचर
## ॲण्ड फॅब्रिकेशन

प्रोप्रा. एम. व्ही. बजाज
मोबा. 9423751415
8888432535
8888372535

दिवाण । शोकेस । ड्रेसिंग । सोफा
देवघर । चौरंग-पाट । डायनिंग टेबल
रॅक । लोखंडी दिवाण । स्टील कपाट
योग्य भावात मिळेल.

मु.पो. राशीन, ता. कर्जत, जि. अहमदनगर

यांनी केला आहे. त्यांच्या मते दिल्ली शहरातील मुस्लिमांची घेट्टोनिर्मिती ही -Anti-Muslim rhetoric and exclusionary Nationalism आहे. अर्थात, मुस्लिमांच्या स्वतंत्र वस्त्या या त्यांच्याविरोधात हेटाळणी आणि द्वेषभावनेच्या राष्ट्रवादी प्रक्रियेचा भाग आहे. दिल्लीच्या इतर भागांतील मुस्लीम सुरक्षिततेच्या चिंतेने जुन्या दिल्लीत स्थलांतरित होऊ लागले आहेत, असं निरीक्षण मेनन यांनी मांडलं आहे. परिणामत: दिल्लीच्या इतर भागांतून मुस्लीम समुदाय अदृष्य होत चालला आहे. जुनी दिल्ली मुस्लिमांची आणि उर्वरित दिल्लीत मुस्लिमांचे प्रमाण नगण्य असे चित्र निर्माण होत चालले आहे.

पुण्यात भवानी पेठ, नाना पेठ, मंगळवार पेठ भागात हिंदू–मुस्लीम अशा संमिश्र वस्त्या कित्येक पिढ्यांपासून आहेत. पुण्यात असलेली हिंदू–मुस्लीम ऐक्याची भावना हे एक आदर्श उदाहरण होते. मात्र, गोध्रा दंगलीनंतर पुण्यातील सामाजिक वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न काही समाजकंटकांनी केला. 'हिंदू राष्ट्र सेने'ने पुण्याच्या हिंदू–मुस्लीम ऐक्याला सुरुंग लावला. शहरात दंगली घडवण्याच्या उद्देशाने मंदिरामध्ये मांस टाकण्यात आले. धनंजय देसाईवर मंदिर अपवित्र केल्याचा आरोप झाला. चिघळलेली परिस्थिती काही सूज्ञ लोकांनी आटोक्यात आणली, अशी आठवण सामाजिक कार्यकर्ते अन्वर राजन यांनी सांगितले. यानंतर सुमारे दहा–बारा वर्षं पुणे शांत होतं. मात्र, पुन्हा एकदा २०१४ साली याच धनंजय देसाईनं शिवाजी महाराजांचा फेसबुकवरून हिंदू धर्माचा अपमान झाल्याचे सांगत शहराची शांतता भंग केली. विरुद्ध गट शांत असल्याने दंगल भडकली नाही. मात्र, 'हिंदू राष्ट्र सेने'ने मोहसिन शेख या आयटी इंजिनीअर तरुणाचा डोक्यात सिमेंट ब्लॉक्स घालून बळी घेतला. हे क्रूर कृत्य त्यांनी सहजप्रेरणेने व देशांत मोदी सरकार सत्तेवर आले म्हणून केले.

२०१४च्या पुणे दंगलीचा राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सत्यशोधन अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार मे २०१४च्या शेवटच्या आठवड्यापासून २ जून २०१४ रोजी झालेल्या मोहसिन शेख हत्या दरम्यान पुण्यातील विविध भागात मदरसे, मस्जिदी, मुस्लीम मालकांची हॉटेल्स/बेकरी यांची 'हिंदू राष्ट्र सेने'च्या दंगेखोरांकडून तोड़फोड़ करण्यात आली. कोणतीही आगळिक नव्हती. एकूण ४० घरांवर हल्ला झाला. २० मस्जिदींची विटंबना झाली. दंग्यात तब्बल साडेचार कोटींचे नुकसान झाल्याचे मानवाधिकार आयोगाच्या अहवालातून समोर आले. परिणामी ह्या परिस्थितीचा आघात पुण्यातील मुस्लिमांवर होणे साहजिक आहे. अशा घटना मुस्लिमांना असुरक्षितपणाची जाणीव करण्यात व परिणामी त्यांना एकत्रित कंपूमधे राहायला उद्युक्त करण्यात मोलाची भूमिका बजावताना दिसतात. पूना कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक मिर्जा असीम बेग कंपूबाबत म्हणतात, 'मोहसिन शेखच्या हत्येनंतर शहरात ३ मस्जिदी जाळण्यात आल्या. या भीतीतून माझे तीन इंजिनियर संमिश्र वस्ती सोडून मित्र कोंढ़वा भागात शिफ्ट झाले.'

सुरक्षितता हे पुण्यातील मुस्लीम समाजाच्या दृष्टीने राहण्याचे ठिकाण निवडण्यामागे एक महत्त्वाचे कारण आहे. कोंढवा भागात राहणाऱ्या एका अन्य आर्किटेक्ट इंजिनियरच्या मते, गोध्रा दंगलीनंतर कोंढवा भागातील मुस्लिमांची संख्या झपाट्याने वाढली. टीआयएसएसने केलेल्या एका सर्वेक्षणातून तब्बल ८० टक्के नागरिकांनी मुस्लीमबहुल भाग निवडीमागे सुरक्षितता हे एकमेव कारण असल्याचे नमूद केले आहे.

## पूर्वग्रह आणि मुस्लीम समाज

कोलकातामध्येदेखील कंपू तयार होण्यामागे तुच्छतावाद हेच प्रमुख कारण सर्वेक्षणात पुढे आलं आहे. 'भद्र' लोकांमध्ये मुस्लिमांविषयी असणारी तुच्छता हे मुस्लिमाच्या घेट्टो बनण्याच्या प्रक्रियेतील प्रमुख कारण असल्याचे सांगितले जाते. पुण्यातील हौसिंग मार्केटमध्ये मुस्लिमांप्रती असणारा पेठीय भेदभाव ठळक आहे. याच कारणामुळे उपनगरातही घरे मिळवण्यासाठी मुस्लिमांना मोठी कसरत करावी लागते.

सामाजिक कार्यकर्त्या शैलजाताईनी पुण्यात जागा खरेदी करतानाचा आपला अनुभव सांगितला.. फोनवरून झालेल्या संभाषणात जागा विकायला तयार असलेल्या व्यक्तीने शैलजा ताईंना भेटून कळविले की, 'मुस्लीम व्यक्तीस जागा विकणार नाही.' यावर शैलजा ताई म्हणाल्या, *'जर मुस्लिमांना त्यांच्या धर्माच्या अधारावर जागा विकत नसाल तर अशा मनोवृत्तीच्या व्यक्तींकडून मला जागा खरेदी करायची नाही.'* सार्वजनिक आयुष्य जगणाऱ्या व्यक्तींना असा अनुभव येणे लाजीरवाणे आहे. काही वर्षांपूर्वी अभिनेता इमरान हाश्मीला मुस्लीम असल्याने मुंबईत घर नाकारले होते. अशा मानसिकतेतून जागामालक व बिल्डरचा मुस्लिमांप्रती असलेला तुच्छतावाद अधोरेखित होतो.

पुण्यात काही हौसिंग सोसायटींनी तर मुस्लिमांना फ्लॅट दिला जाणार नाही असा अलिखित नियम बनवल्याचे अभ्यासाअंती दिसून येते. लेखाच्या पुढील भागात यावर सविस्तर टिप्पणी केलेली आहेच.

मुस्लिमांना घर नाकारणाच्या बऱ्याचशा प्रकरणात मांसाहार सेवनाचं कारण पुढे केल्याचे दिसते. परंतु मुस्लीम रहिवासी नसणाऱ्या बऱ्याच हौसिंग सोसायटीत ज्यांमध्ये बऱ्याचशा को–ऑपरेटिव्ह आहेत, अशा सोसायटीत मांसाहार करणाऱ्या समाजाचे लोक आढळतात, पण ते मुस्लीम नाहीत. हे स्पष्ट आहे की मांसाहार हे मुस्लिमांना घर नाकारण्यासाठी सोयीस्कररीत्या अवलंबलेली शक्कल आहे.

जुलै २००८ साली 'अशोका मेव्स' या कोंढवा स्थित सोसायटीमध्ये २ इंडियन मुजाहिदीनच्या संशयितांना अटक झाली. यानंतर सोसायटीमधील हिंदू रहिवाशांनी इतर ठिकाणी

स्थलांतरित होण्याची इच्छा व्यक्त केल्याचे टाईम्स ऑफ़ इंडियाच्या बातमीमध्ये दिसून आले. या घटनेनंतर अनेक बिगर मुस्लीम कुटुंबे कोंढव्यातून हिंदूबहुल भागात स्थलांतरित झाली आहेत. संधी चालून आल्याने आणि गुंतवणुकीच्या उद्देशाने मुस्लिमांनी ही मिळकत घेतली. व्यवसायाने बिल्डर असणाऱ्या आरीफ चौधरी यांच्या म्हणण्यानुसार 'अशोका मेव्स' सोसायटीमध्ये पूर्वी ५०-५० टक्के हिंदू-मुस्लीम कुटुंब प्रेमाने राहत असत. आता तिथे सुमारे ९० टक्के मुस्लीम निवासी आहेत. परिणामतः हिंदूंचे पलायन आणि मुस्लिमांची वाढती निवासी संकुले यामुळे कोंढवा भागाची मुस्लीमबहुल भाग म्हणून ओळख निर्माण होऊ लागली आहे. (संदर्भ- इंडियन एक्सप्रेस, ८ ऑगस्ट २००८)

## हौसिंग मार्केटमध्ये भेदभाव

इतर भारतीय शहरांतील मुस्लीम कंपूप्रमाणेच पुण्याच्या कोंढवा भागातील मिठानगर-भाग्योदयनगर भागात वेगाने मुस्लीम वस्त्या वाढत आहेत. या भागात पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था पाहायला मिळते. छोटे रस्ते, तुंबलेली गटारे, कचऱ्याचे ढीग, वाहनांचा कल्लोळ, फोफावणारे रियल एस्टेट, बेकायदेशीर बांधकाम, टेकडीफोड, विस्तारणाऱ्या अनधिकृत वसाहती इत्यादी गोष्टींकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. पुण्यात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले की ऑगस्ट २००८नंतर हौसिंग मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात भेदभावाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील मुस्लीम लोकसंख्या असणाऱ्या कोंढवा, मिठानगर-भाग्योदयनगर, एनआयबीएम रोड, कौसरबाग, कॅम्पमध्ये भिन्न आर्थिक गटातील मुस्लीम रहिवासी राहतात. यांचा सर्वेक्षणात समावेश करण्यात आलेला आहे. हौसिंग मार्केटमध्ये होणारा भेदभाव, असुरक्षितता, बहुसंख्य समाजात मुस्लिमांविषयी असणारा तुच्छतावाद आणि अशा कंपूमध्ये राहणाऱ्या मुस्लिमांच्या मनातील 'स्वप्नांचे घर' या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आले होते.

पुण्यातील बोट क्लब रोडच्या रहिवासी माधवी कपूर यांनी कोरेगाव पार्कमध्ये राहायचा निर्णय घेतला. त्यांचा पंधराशे चौरस फूट क्षेत्रफळाचा फ्लॅट एका मुस्लीम व्यक्तीला त्यांनी विकण्याचा निर्णय घेतला. यावर सोसायटीमध्ये राहणाऱ्या इतर रहिवाशांनी आक्षेप घेतला. सोसायटीत मुस्लीम परिवाराला कुठल्याही परिस्थितीत जागा दिली जाऊ नये, असा पवित्रा सर्वांनी घेतला.

कपूर यांनी सांगितलं की, *'सोसायटीच्या नियमांप्रमाणे घर घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीची ओळख इतर सभासदांना करून दिली. तेव्हा कोणीही आक्षेप घेतला नव्हता. कारण त्याचे आडनाव हिरानी होते. या आडनावाची व्यक्ती सभासदांना सोसायटीमध्ये राहणाऱ्या इतर ८० टक्के लोकांप्रमाणे सिंधी (हिंदू) असावी असे वाटले होते. जेव्हा सभासदांना कळले की सदर व्यक्ती सिंधी नसून 'बोहरी मुस्लीम' आहे, तेव्हा सर्वांनी एकमताने त्यांना घर विकता येणार नाही, अशी भूमिका घेतली. काहींनी तर ५ लाख जादा देऊ करणारे ग्राहक देण्याची हमी दिली. पण मी शब्द दिला असल्याने घर विकण्याच्या माझ्या मतावर मी ठाम राहिले.'* सोसायटीकडून कपूर यांना 'नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट' अद्यापही देण्यात आलेले नाही. (संदर्भ- इंडियन एक्सप्रेस, ३ एप्रिल २००८) माधवी कपूर यांचं उदाहरण पाहता त्या आपल्या तत्वाला बांधील राहिल्या. तेव्हा सोसायटीला झुकावं लागलं.

*पुण्यातील सदाशिव पेठ ते कोथरूड, वारजे ते कात्रज, या सर्व भागात मुस्लिमांप्रती अशीच धारणा पाहायला मिळते. जुबेरला त्याच्या स्वप्नातील घराविषयी विचारले असता, तो म्हणाला, 'संधी मिळली तर औंध भागात राहायला आवडेल, इथून माझे कॉलेज जवळ आहे, त्यामुळे माझा बराचसा वेळ वाचेल'.*

माझ्या संशोधनात आले की, पुण्यात मुस्लिमांना घर नाकारण्याची मीडियात आलेली ही एकमेव बातमी होती. अशा घटना माध्यमात येत नसल्या तरी शहरात सर्रास घडताना दिसतात. पुण्यात उच्च शिक्षणासाठी अनेक विद्यार्थी येतात. शहराच्या मध्यवर्ती भागात शैक्षणिक संस्था असल्याने विद्यार्थ्यांची जवळपास राहण्याला अग्रक्रम असतो. पण विविध पेठांत मुस्लीम या विद्यार्थ्यांना अनेक भेदभावांना सामोरे जावं लागतं. शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थी तडजोड स्वीकारतात. २१व्या वर्षी आयएएस झालेल्या अन्सार शेखच्या भेदभावाची बातमी नुकतीच नॅशनल मीडियात वाचनात आली. तो मुस्लीम असल्याने पेठेत त्याला घर नाकारण्यात आल्याचे त्याचे म्हणणे होते. शहरात रियल एस्टेटमध्ये ब्रोकरेजचे काम करणारे शक्रुद्दीन मुजावर याबाबतीत म्हणतात,*'अशा स्वरूपाच्या घटना त्यांना दिवसागाणिक पाहायला मिळतात. राहायला घरे मिळवून देण्यासाठी अनेक मुस्लीम कुटुंबे विनवण्या करतात, हे पाहून मन हेलावते. परिणामी मुस्लीम वस्त्यांत त्यांना न्याय मिळतो.'*

शहरात मुस्लिमांना घर देण्यास नकार दिल्याच्या असंख्य घटना आहेत. यावरून हे लक्षात येते की, पुण्यातील हौसिंग आणि मुस्लीमांची कंपूनिर्मिती यातील संबंध लक्षात घेण्याजोगा आहे. आलम तांबोळी यांनी परांजपे हौसिंग सोसायटीमध्ये घर बुक केले. बिल्डरच्या निदर्शनास आले की सदर व्यक्ती मुस्लीम आहे. तेव्हा त्यांनी बुकिंगचे पैसे परत दिले. दुसऱ्या एका घटनेत जुबेर अहमद या विद्यार्थ्याचा औंध भागात फ्लॅट घेण्याचा अनुभव हा पुण्यात मुस्लिमांविषयी बहुसंख्यांक मनात असणाऱ्या मुस्लीम द्वेषाचे बोलके उदहारण आहे. जुबेरला त्याच्या

अनुभवाबद्दल विचारले असता तो म्हणाला, *'२०१२ साली औंध भागात शिकत असताना माझ्या परिवारासाठी फ्लॅट शोधत होतो. काही सोसायट्यांमध्ये मला प्रवेश नाकारण्यात आला. तर वीसएक सोसायट्यांनी घर देण्यास चक्क नाकारले. मी मुस्लीम आहे हे घर नाकारण्याचे कारण आहे हे मला कळत होते. नकार देणारे बऱ्यापैकी उच्चशिक्षित होते. यातले काहीजण डॉक्टर होते. कोथरूड भागातील व्यवसायाने वकील असणाऱ्या एका घरमालकाने माझे नाव ऐकताच अनेक प्रश्न केले. तुझ्या घरातील महिला बुरखा घालतात का? पाकिस्तानमध्ये तुझे नातलग आहेत का? असे अतार्किक प्रश्न वकील महाशयाने विचारले, औंधमधील अनेक ब्रोकरनासुद्धा माहीत आहे की, मुस्लिमांना सहजासहजी घरे मिळत नाहीत, अखेर या सर्वाला कंटाळून मी एनआयबीएम रोड परिसरात राहायला गेलो.*

पुण्यातील सदाशिव पेठ ते कोथरूड, वारजे ते कात्रज, या सर्व भागात मुस्लिमांप्रती अशीच धारणा पाहायला मिळते. जुबेरला त्याच्या स्वप्नातील घराविषयी विचारले असता, तो म्हणाला, *'संधी मिळली तर औंध भागात राहायला आवडेल, इथून माझे कॉलेज जवळ आहे, त्यामुले माझा बराचसा वेळ वाचेल'*. मैनुद्दीन सय्यद व त्यांच्या पत्नी पूना कॉलेजमध्ये प्राध्यापक आहेत. ते सध्या भवानी पेठेत राहतात. आपल्या लहान घराच्या जवळपास एखाद्या मोठ्या घरात राहण्याचा त्यांचा संकल्प होता. पाच वर्ष शोधल्यानंतरही त्यांना घर मिळाले नाही. अखेर तेही एनआयबीएम परिसरात राहायला गेले. त्यांच्या राहत्या घरापासून त्यांचे कॉलेज सात किलोमिटर आहे. तर त्यांच्या मुलीला फर्ग्युसन कॉलेजला जाण्यासाठी रोज १३ किलोमिटर प्रवास करावा लागतो.

पुण्यातील मुस्लीम समाजाची निवासस्थाने आर्थिक सधनतेनुसार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग लोहियानगर, हडपसरच्या एसआरए योजनेअंतर्गत मिळालेल्या घरात राहतो. मध्यमवर्ग कोंढवा भागातील भाग्योदयनगर व मिठानगरसारख्या भागात असतो. या भागातील घरांचे मालक आर्थिकदृष्ट्या संपन्न आहेत. त्यांच्या वसाहती इतर उच्च वर्गातील मुस्लिमांसोबत कौसरबाग, एनआयबीएम परिसरात आहेत. 'फखरी हील' ही बोहरा मुस्लिमांची मोठी वसाहत कोंढवा भागात आहे. इथं फक्त बोहरी मुस्लिमांचा कंपू आहे. वर उल्लेखित भागातील घरांच्या किमती कोटींच्या आकड्यात आहेत. यावरून असे लक्षात येते की मुस्लिमांमधील आर्थिक सक्षमता आणि त्यांचे या भागातील वाढणारे निवासी कंपू यांचा तसा तार्किक संबंध नाही.

मिठानगर, कौसरबाग़, एनआयबीएम रोड भागात राहणाऱ्या मुस्लीम कुटुंबांच्या सर्वेक्षणातून असे आढळून आले की, सुमारे ७० टक्के मुस्लिमांना हिंदू बहुल भागात घर नाकारल्याने नाईलाजास्तव घेट्टोमध्ये राहण्याची वेळ आली. या भागातील मुस्लिमांना त्यांच्या स्वप्नातील घराविषयी विचारले असता ७५ टक्के लोकांनी घेट्टोबाहेर राहाण्याची इच्छा व्यक्त केली. आरीफ चौधरी व्यवसायाने बिल्डर आहेत. ते म्हणतात डेक्कन, भांडारकर, प्रभात रोडला मी स्वप्नातील माझे घर बघतो. माझ्या संशोधनातून असे आढळले की सुमारे ८० टक्के मुस्लीमबहुल भागात राहाणाऱ्या लोकांनी पुण्यात घर घेताना भेदभाव होत असल्याची कबुली दिली. आजच्या परिस्थितीत हिंदू बहुल भागात घर घेताना मुस्लीम असण्यावरून भेदभाव होण्याची शक्यता वर्तविली.

हिंदू बहुल भागात मुस्लिमांवर होणाऱ्या भेदभावाचा परिणाम शहरातील मुस्लिमांतदेखील दिसून येतो. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे माजी अध्यक्ष सय्यदभाई त्यांच्या उदबत्ती कारखान्यासाठी जागा शोधत असताना कोंढव्यातील मालकाने ते मुस्लीम असतील तरच जागा विकू असे भेटीत कळवले. सय्यदभाईंनी जागा घेण्यास नकार दिला. घेट्टोमध्ये राहणाऱ्या जवळपास ४० टक्के मुस्लिमांनी घर विकताना मुस्लिम ग्राहकांनाच प्राधान्य देण्याचा पवित्रा घेतल्याचे दिसले. यावरून लक्षात येते की घर नाकारण्याच्या वृत्तीचा शिरकाव मुस्लिमांमध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात झाला आहे. ही बाब खरोखरच चिंतनीय आहे.

## कायदेशीर बाजू

सुप्रीम कोर्टाने २००५ साली झोराष्ट्रीयन को ऑपरेटिव्ह सोसायटी विरुद्ध जिल्हा निबंधक या खटल्यात घटनेचे कलम १९ (ल) (एकत्रित जमण्याचा अधिकार) अंतर्गत धर्माच्या आधारे घर नाकारणाऱ्या सोसायटीला जबाबदार धरू शकत नाही असा निकाल दिला. तज्ज्ञांच्या मते कोर्टाच्या या निर्णयाने हौसिंग सोसायटींना धर्माधारे भेदभावाला एका प्रकारे चालनाच मिळाली. दुसरीकडे सच्चर समितीच्या अहवालात मुस्लिमांतील तुटलेपणाची भावना कमी करण्यासाठी रोजगार आणि हौसिंग मार्केटमधील समान संधी मिळण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत मांडले आहे. मुस्लीम समाजातील वाढते घेट्टो रोखण्यासाठी सच्चर समितीच्या शिफारशींची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणे खूप गरजेचे आहे. महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या कुंडू कमिटीने हौसिंग मार्केटमध्ये मुस्लिमांना समान संधी देण्याची शिफारस केली आहे.

*(लेखक टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्समध्ये संशोधक असून त्यांनी मुस्लिमांच्या घेट्टोवर सखोल संशोधन केले आहे)*

**शाहरुख़ खतीब**
डफळापूर, ता. जत, जिल्हा सांगली पिन-४१६४०२
मेल - shahrukh2301gmail.com
मो. ९७६६४०७२७६